# मुलांमधील क्षय निदानासाठी नवे मास्क तंत्र!

## वेदनारहित प्रक्रियेकरिता 'एफएमआर'चे अद्ययावत संशोधन

**भाग्यश्री भुवड : सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २२ : मुलांमधील क्षयाचे निदान करणे आव्हानात्मक असून सध्याची प्रचलित पद्धती त्यांच्यासह पालकांनाही त्रासदायक ठरत आहे. परिणामी मास्क पद्धतीतून मुलांमधील क्षयाचे निदान करण्याबाबत संशोधन करण्यात आले आहे. वैद्यकीय क्षेत्रात असे तंत्र सुरू झाल्यास क्षयबाधित मुलांवर उपचार लवकरात लवकर करणे शक्य होणार आहे. त्यातून क्षयामुळे होणारे मृत्यूचे प्रमाणही रोखण्यास मदत होईल, असे या तंत्राचे संशोधन करणाऱ्या एफएमआर (द फाऊंडेशन फॉर मेडिकल रिसर्च) चमूच्या तज्ज्ञांकडून सांगण्यात आले.

'एफएमआर'च्या सहाय्यक संशोधक डॉ. अंबरिन शेख यांनी सांगितले, की मुळात क्षयाचे जीवाणू कमी प्रमाणात असतात. मुलांमधील टीबीचे निदान मुलांच्या पोटात एक नळी टाकून गॅस्ट्रिक लवास काढून केले जाते. पोटातील पाणी तपासले जाते. त्या तपासणीतून क्षयाचे निदान केले जाते. मात्र गॅस्ट्रिक लवास पद्धती मुलांना आणि पालकांसाठी त्रासदायक वाटते. कारण त्यात लहान मुलांच्या पोटात एखादी नळी टाकली जाते. सर्वच मुलांना ते सहन होत नाही. त्यामुळे आम्ही सहज निदान होणाऱ्या पद्धतीचे संशोधन केले आहे.

तपासणीसाठी मुलांची संख्या वाढवायची असल्याचे असोसिएट रिसर्च अधिकारी डॉ. कल्पना श्रीरामन यांनी सांगितले. बी. जे. वाडिया, जे. जे. रुग्णालय आणि गोवंडीमधील टीबी क्लिनिकमधील मुलांचे नमुने मास्क तंत्र पद्धतीने घेण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले.

नव्या तंत्राची चाचपणी सुरू आहे. सध्या लॅब पातळीवर त्याबाबत काम सुरू असून विविध तज्ज्ञ त्यावर अभ्यास करत आहेत. मास्क तंत्र यशस्वी झाल्यास सरकारी पातळीवर अवलंब करण्यात येणार आहे. आरोग्य यंत्रणेसाठी नवे तंत्र महत्त्वाचे ठरणार आहे. शहरांपुरते मर्यादित न राहता ते देशातील सर्वसामान्यांसाठी खुले करण्याचा विचार आहे. सध्या कोविडमुळे आरटीपीसीआर चाचणीचे तंत्र सर्वांनाच अवगत आहे. फक्त मेंब्रन डिस्क मास्कमध्ये टाकून नमुने गो करणे आणि अन्य बाबींचे प्रशिक्षण दे आवश्यक आहे.

### असे आहे क्षय निदान मास्क तंत्र

१ मास्क पद्धती निदान मुलांच्या कोणत्याही अवयवाला न दुखावता करता येते. मास्कमध्ये जिलेटिन मेंब्रन डिस्क टाकून तो मुलांना घालण्यात येतो.



२ मास्क घातलेल्या अवस्थेत मुले बोलतात, खोकतात, शिंकतात किंवा गातात. अशी कोणतीही सामान्य प्रक्रिया ती करतात. असे करत असताना मास्कमधील जिलेटिनमध्ये बाळाच्या शरीरातील शिंतोडे (ड्रॉपलेट्स) फसतात. फसलेल्या जिलेटिन मेंब्रन डिस्कची आरटीपीसीआर पद्धतीने तपासणी केली जाते. अशी पद्धती सोपी आहे.



३ तूर्तास मास्क पद्धतीने एकूण ५० मुलांची तपासणी करण्यात आली आहे. त्यात तीस मुले क्षय बाधित होती. वीस मुलांना अन्य आजार होते. त्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. त्यातून मास्क पद्धतीचे तंत्र काम करते की नाही यावर अभ्यास सुरू आहे.

नव्या तंत्राबाबत खात्री आहे. मात्र, प्रत्यक्षात काम करताना ते कसे प्रतिसाद देते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. आधीच्या तंत्राच्या तुलनेत नागरिक मास्क क्षय निदान तंत्र लवकर मान्य करतील. अशा रीतीने लवकर क्षयाचे निदान होईल.
- डॉ. नरगिस मिस्त्री, संचालिका, एफएमआर